**शैक्षणिक संदर्भ अंक १२७ डिसेंबर २०२० – जानेवारी २०२१**

# सातवा माणूस

## (भाग १)


लेखक : हारुकी मुराकामी अनुवाद : यशश्री पुणेकर

# सातवा माणूस

## (भाग १)

लेखक : हारुकी मुराकामी अनुवाद : यशश्री पुणेकर

“एक मोठी लाट जवळजवळ मला ओढून घेऊन गेली.” सातवा माणूस



कुजबुजल्यासारखं म्हणाला. “सप्टेंबर महिन्यात एका दुपारी ही घटना घडली तेव्हा मी फक्त दहा वर्षांचा होतो.”

त्या रात्री गोष्ट सांगणारा तो शेवटचा माणूस होता.

रात्रीचे दहा वाजून गेले होते. त्या छोट्याशा घरात अडचणीत बसलेल्या लोकांना बाहेर अंधारात पश्चिमेकडे वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज जाणवत होता. वारा इतका जोरात होता की झाडं

जोरजोरात  हालत होती, खिडकीची दारं वाजत होती आणि शेवटी शिट्टी मारल्यासारखा आवाज करत वारा घरातून आरपार जात होता.

"मी तोपर्यंत माझ्या आयुष्यात इतकी मोठी लाट बघितलीच नव्हती." तो म्हणाला,  "खूप विचित्र लाट होती ती! राक्षसी लाट." इतकं बोलून तो थांबला.

"मी त्या लाटेच्या तडाख्यातून कसाबसा वाचलो. पण त्या बदल्यात माझ्यासाठी अतिशय महत्त्वाच्या सगळ्या गोष्टी त्या लाटेने गुंडाळून दुसऱ्या दुनियेत ओढून नेल्या. आयुष्य पुन्हा रुळावर येण्यासाठी आणि या अनुभवातून सावरण्यासाठी मला अनेक वर्षे लागली. ती माझ्या आयुष्यातली खूप अनमोल वर्षे होती आणि त्यांची भरपाई आता कशानेच होणं शक्य नाही."

त्या सातव्या माणसाचं वय पंचावन्नच्या आसपास असेल. तो उंच आणि लुकडा होता. त्याने मिशा राखल्या होत्या आणि त्याच्या उजव्या डोळ्याच्या खोबणीत छोटा पण खोल वण होता. एखाद्या  चाकूच्या घावाची ती खूण असावी.  त्याचे छोटे राठ केस टोचणाऱ्या पांढऱ्या गुच्छासारखे दिसत होते. विचार व्यक्त करायला शब्द सापडत नसावेत असे भाव त्याच्या चेहऱ्यावर होते. खरंतर हा भाव त्याच्या चेहऱ्यावर खूप आधीपासूनच होता... जणूकाही त्याच्या चेहऱ्याचा अभिन्न भागच! त्याने धुरकट लोकरीचा कोट घातला होता आणि त्याच्या आत निळ्या रंगाची खमीस. तो सारखा हात खमीसच्या कॉलरकडे नेत होता. तिथे जमलेल्या लोकांपैकी कोणालाही त्याचं नाव माहिती नव्हतं आणि तो काय करतो हे सुद्धा माहिती नव्हतं. त्याने घसा खाकरला आणि एक दोन क्षण त्याचे शब्द जणू शांततेत हरवून गेले. लोक त्याच्या बोलण्याची वाट पाहू लागले.

“माझ्यासाठी तर ती एक राक्षसी लाटच होती.” तो म्हणाला, “तुम्हा सर्वांसाठी ती कशी असेल हे मी सांगू शकत नाही. पण माझ्यासाठी मात्र तिने महाकाय रूप धारण केलं होतं. कोणतीही सूचना न देता ती अचानक भीमकाय रुपात माझ्या समोर आली आणि तीच विध्वसंक ठरली.”

“मी समुद्र किनाऱ्यावरच्या ‘स’ शहरातच राहिलो, मोठा झालो. ते खूपच छोटं शहर होतं. तुम्ही त्याचं नाव कधी ऐकलंही नसेल. माझे वडील तिथले स्थानिक डॉक्टर होते. त्यामुळे माझं बालपण आरामात गेलं. मला आठवतंय माझा एक घनिष्ट मित्र होता. त्याला आपण ‘क’ नाव देऊ. त्याचं घर आमच्या घराच्या जवळच होतं. तो शाळेत माझ्या मागे एक वर्ष होता. आम्ही अगदी भावासारखे होतो... शाळेत एकत्र जायचो यायचो, एकत्रच खेळायचो. इतक्या वर्षांच्या आमच्या मैत्रीत कधी भांडण झाल्याचं आठवत नाही. खरंतर मला माझ्यापेक्षा सहा वर्षांनी मोठा सख्खा भाऊ होता. पण वयात अंतर होतं तसंच आमच्या स्वभावातही खूप फरक होता. त्यामुळे त्याचं माझं काही फारसं सख्य नव्हतं. भावासारखं प्रेम मला ‘क’ मित्राबद्दल वाटत असे.”

“ ‘क’ छोट्या अंगकाठीचा, लुकडा होता. त्याची त्वचा पिवळट रंगाची होती. त्याचा चेहरा मात्र एखाद्या मुलीसारखा सुंदर होता. तो थोडा तोतरं बोलायचा. त्यामुळे अनोळखी लोकांना तो जरा मंदबुद्धीचा वाटत असे. तो फारच अशक्त होता त्यामुळे मी नेहमीच शाळेत किंवा गल्लीत त्याचा रक्षक म्हणून वावरत असे. मी चांगला हट्टाकट्टा आणि ताकदवान होतो. सगळी मुलं मला वचकून असत. पण ‘क’ मला जास्त आवडत असे कारण तो मनाने अगदी निर्मळ आणि प्रेमळ होता. मंदबुद्धी तर तो अजिबातच नव्हता पण तोतरं बोलत असल्याने

शाळेत तो काही फार चांगला विद्यार्थी मानला जात नसे. बऱ्याच विषयांत तो जेमतेम पास व्हायचा. पण चित्रकलेत मात्र त्याला काही तोडच नव्हती. पेन्सिल किंवा रंग हातात येताच इतकी सुंदर चित्र काढायचा की शिक्षकही चकित व्हायचे. कित्येक स्पर्धांमध्ये त्याच्या चित्रांना वारंवार बक्षीसं मिळाली होती. मला खात्रीं आहे की जर मोठेपणी सुद्धा त्याने चित्रकला सुरु ठेवली असती तर तो खूप मोठा प्रसिध्द चित्रकार झाला असता.

'क' ला समुद्राची चित्रं काढायला खूप आवडत असे. तो तासनतास किनाऱ्यावर बसून समुद्राची चित्रं काढत असे. मी पण नेहमी त्याच्याबरोबर बसून त्याच्या कुंचल्याची करामत बघत असे. मला नवलच वाटायचं. एकदम स्वच्छ पांढऱ्या कागदावर काही क्षणातच तो चमकदार रंगांनी एखादं चित्र जिवंत कसा करतो? त्याच्याकडे चित्रकलेचं उत्तम ज्ञान उपजतच होतं याची मला आत्ता जाणीव होतेय."



"एके वर्षी सप्टेंबर महिन्यात आमच्या भागात भयानक समुद्री वादळ आलं. रेडिओवर सांगितलं की गेल्या दहा वर्षांत इतकं भयंकर वादळ आलेलं नव्हतं. सगळ्या शाळांना सुट्ट्या दिल्या आणि वादळाच्या भीतीने सगळी दुकानं पण बंद केली गेली. सकाळी लवकरच उठून माझ्या भावाने आणि वडिलांनी सगळे दरवाजे आणि खिडक्यांना जास्तीचे खिळे ठोकून ठेवले. इकडे

स्वयंपाकघरात आई वेळ पडली तर असावा म्हणून जास्तीचा स्वयंपाक करण्यात गुंगली. आम्ही घरातल्या सगळ्या बाटल्यांमध्ये पिण्याचं पाणी भरून ठेवलं. सगळ्या महत्त्वाच्या आणि किमती वस्तू मोठ्या पोत्यात भरून ठेवल्या. गरज वाटली तर त्या घेऊन आम्ही दुसरी कडे कुठेतरी जाऊ शकलो असतो.

वयस्कर माणसांना समुद्री वादळ म्हणजे भीतीदायक संकट वाटत होतं कारण ते त्याला जवळजवळ दरवर्षी तोंड देत होते. पण आम्हा व्यावहारिक चिंतेपासून दूर असलेल्या



मुलांना हे वादळ म्हणजे एक अद्भुत चमत्कार होता. जणू काही सर्कसच! ते बघून जरा विचित्र, अवास्तव वाटायला लागलं. मी बाहेर उभं राहून आकाशाकडे बघत होतो. थोड्याच वेळात वादळी हवा जोरजोरात वाहात धिंगाणा घालू लागली. विचित्र आवाज करत तुफान पाऊस पडू लागला. वारा आणि पावसाने घराला झोडपायला सुरुवात केली. जणू काही रेतीचाच पाउस पडतोय असं वाटत होतं. आम्ही पळत पळत घरात गेलो आणि दारं, खिडक्या घट्ट लावून घेतल्या. एका अंधाऱ्या खोलीत आम्ही एकमेकाला बिलगून रेडिओ ऐकत बसलो. रेडिओवर सांगत होते की या वादळासोबत फार जोराचा पाउस आलेला नाही पण तुफान वारा मात्र कहर करतोय. कित्येक घरांची छप्परं उडाली. कितीतरी जहाजं वादळात अडकून समुद्रात बुडाली. उडणाऱ्या दगड विटा लागून कितीतरी लोक जखमी झाले. रेडिओवरून लोकांना सारखं घरातच राहाण्याचं आवाहन केलं जात होतं. मध्येच आमचं घर चर्रर चर्रर आवाज करत हालत होतं, जणूकाही कोणीतरी दोन्ही हातांनी

धरून त्याला हालवतंय! एखादी जड वस्तू बंद खिडकी किंवा दरवाज्यावर आपटून मोठा भीतीदायक आवाज येत होता. बाबांना वाटत होतं की हा आवाज शेजारच्या घराची कौलं उडून पडतात त्याचा आहे. दुपारी आम्ही सगळयांनी आम्लेट आणि भात खाल्ला. घरातल्या एकाच खोलीत बसून आम्ही रेडिओवरच्या बातम्या ऐकत होतो आणि वादळ संपायची वाट पाहत बसलो होतो.


वादळी वारा अजूनही वाहतच होता. खरंतर रेडिओवर सांगत होते की आमच्या भागातून पुढे जाताना वादळाची गती मंदावली आहे. आता ते कमी वेगाने उत्तर पूर्वेकडे जाते आहे. पण तरीही तुफानी वाऱ्याचा हिंसक धिंगाणा थांबण्याचं नाव घेत नव्हता. तीव्र वेगाने वाहणारे वारे जमिनीवरच्या प्रत्येक वस्तूला उखडून धरतीच्या दुसऱ्या टोकाला नेण्याचा प्रयत्न करत होते.

वादळाच्या सर्वाधिक वेगाला आता साधारण तास होऊन गेला होता आणि अचानक सगळीकडे स्तब्धता पसरली. चहूकडे इतकी शांतता पसरली की दूर कुठेतरी बोलत असलेल्या पक्ष्याचा आवाजही स्पष्ट ऐकू आला. बाबांनी एक दरवाजा थोडासा उघडून बाहेर डोकावून बघितलं. वारा पूर्णपणे थांबला होता आणि आता पाऊसही पडत नव्हता. काळे धूसर ढग आकाशातून हळूहळू पुढे सरकत होते. आणि त्यांच्या मध्ये मध्ये निळया आकाशाचे तुकडे दिसत होते. अंगणातल्या झाडावरून अजूनही पावसाचं पाणी टपकत होतं. “आता आपण समुद्री वादळाच्या केंद्र स्थानी असलेल्या शांत भागात आहोत.” बाबा म्हणाले. “इथे आता काही वेळ असंच सगळं शांत राहील. साधारण पंधरा वीस मिनिटं अशीच जातील आणि नंतर पुन्हा तुफानी वादळ पहिल्यासारखं तीव्र वेगाने परत येईल.”

मी बाहेर जाऊन येऊ का असं विचारल्यावर ते म्हणाले, "जा, घराच्या आसपासच फिरून ये. पण वादळ पुन्हा सुरु व्हायची चिन्हं दिसताच लगेच घरात परत ये."

मी बाहेर जाऊन इकडे तिकडे बघू लागलो. इतकी शांतता होती की कोणाचा विश्वास बसला नसता की अगदी काही वेळापूर्वी इथे भयंकर वेगात वादळ आलं होतं. मी आकाशाकडे बघितलं. मला जाणवलं की या वादळाचा केंद्रबिंदू आकाशात असेल. आणि या भागात राहणाऱ्या सगळ्यांकडे रागीट नजरेने बघत असेल. खरंतर असं काहीच नव्हतं आणि आम्ही सगळे समुद्री वादळाच्या केंद्र स्थानातील शांत भागात होतो.

जेव्हा मोठी माणसं बाहेर येऊन घराच्या नुकसानीची पाहणी करत होती तेव्हा मी समुद्राकडे निघालो. रस्ताभर झाडांच्या तुटलेल्या फांद्या आणि खोडं पडली होती. काही देवदाराची खोडं तर इतकी मोठी होती की एखादा मोठा माणूस त्यांना एकट्याने हलवू पण शकला नसता. सगळीकडे छतावरच्या कौलांचा खच पडला होता. रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्यांच्या काचांचा चुरा पडलेला होता. कुत्र्याचं घर कुठून तरी उडून रस्त्यावर येऊन पडलं होतं. असं वाटत होतं की आकाशात राहणाऱ्या सर्वशक्तीमान हाताने आपल्या रस्त्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला उधळून टाकलं होतं. 'क' ने मला समुद्रावर जाताना बघितलं आणि पळत माझ्यापाशी आला.



"कुठे चालला आहेस?" त्याने विचारलं. "समुद्रावर जाऊन बघून येतो." मी म्हणालो.

मग एकही शब्द न बोलता तो माझ्या बरोबर चालू लागला. त्याचा छोटा पांढरा कुत्राही आमच्या मागे मागे चालू लागला. "वादळ परत यायचं चिन्हं दिसताच लगेच आपल्याला घरी जायचंय." मी असं म्हणताच 'क'ने मान डोलावली.

किनाऱ्यापासून माझं घर साधारण दोनशे मीटर असेल. किनाऱ्यावर एक दगडांची घट्ट भिंत बांधली होती. हा एक बांधच होता म्हणा ना... साधारण माझ्या उंचीचा. पाण्यापाशी जाण्यासाठी काही पायऱ्या चढून जावं लागे. इथे तर आम्ही रोजच खेळायला यायचो. त्यामुळे इथला कानाकोपरा आम्हाला चांगलाच ठाऊक होता. पण त्यावेळी वादळाच्या केंद्रस्थानी असलेल्या शांत भागात असल्याने तिथलं सगळं वेगळंच वाटत होतं. मग ते आकाश असू दे, समुद्राचा रंग असू दे, लाटांचा आवाज असू दे, भरती ओहोटीचा गंध असू दे नाहीतर समुद्राचं सगळं दृश्य असू दे, आज सगळंच वेगळं होतं.

काही काळ आम्ही एकमेकांशी काहीही न बोलता त्या भिंतीवर बसून समोरचं दृश्य बघत राहिलो. आम्ही एका तथाकथित भयंकर समुद्री तुफानाच्या मध्यात होतो पण शांत लाटांमध्ये जणू काहीतरी चमत्कारिक गोष्ट दडली होती. आणि त्या दिवशी लाटा समुद्राच्या खूप आतल्या भागात होत्या. भरती ओहोटीच्या वेळेला नेहमी जिथपर्यंत लाटा येतात त्याच्याही खूप पलीकडे समुद्रात लाटा येत होत्या. त्यामुळे किनाऱ्यावर बऱ्याच दूरवर सफेद वाळू दिसत होती. जर तुटलेल्या जहाजांच्या तुकड्यांकडे दुर्लक्ष केलं तर ती जागा एखाद्या बिनासामानवाल्या रिकाम्या खोलीसारखी वाटत होती.

आम्ही भिंतीवरून किनाऱ्यावर उड्या मारल्या आणि लाटांनी किनाऱ्यावर आणून टाकलेल्या गोष्टी बघत फिरू लागलो. तिकडे वाळूवर प्लास्टिकची खेळणी, चपला, एखाद्या

टेबल किंवा खुर्चीचा मोडका लाकडी भाग, कपड्याच्या चिंध्या, विचित्र आकाराच्या बाटल्या, टोपल्या अशा अनेक गोष्टी होत्या. त्यांच्यावर विदेशी भाषेत काहीतरी लिहिलेलं होतं. वाळूत इतक्या गोष्टी पडल्या होत्या की त्या रामरगाड्यात कुठल्या वस्तूंचे अवशेष कोणते हे सुद्धा समजत नव्हतं. असं वाटत होतं की उद्ध्वस्त गोष्टींचं मोठं दुकानच उघडलंय. ते समुद्री वादळ या सर्व गोष्टी कुठूनतरी लांबून घेऊन आलं होतं. आम्ही चालता चालता काही वेगळी गोष्ट दिसली की उचलून घ्यायचो. तिचं सगळ्या बाजूंनी निरीक्षण करायचो. जेव्हा परत वाळूत ठेवून द्यायचो तेव्हा ‘क’ चा कुत्रा त्याला हुंगून त्याचा वास घ्यायचा.

आम्ही असेच हिंडत होतो त्याला पाच मिनिटं झाली असतील तेवढ्यात मला जाणवलं की आता लाटा आमच्यापर्यंत यायला लागल्या आहेत. काहीही आवाज न करता समुद्राने त्याची लांब गुळगुळीत जीभ आम्ही जिथे उभे होतो तिथपर्यंत पसरायला सुरुवात केली होती...

(क्रमशः)

*हिंदी शैक्षणिक संदर्भ अंक ११५ मधून साभार*

**§§§**

---

लेखक: **हारुकी मुराकामी,** जपानी कादंबरीकार, कथालेखक आणि अनुवादक.

हिंदी अनुवाद: **सुशांत सुप्रिय**, प्रसिद्ध हिंदी कथाकार, कवी आणि अनुवादक.

चित्रे: **शिवांगी सिंह**, फाइन आर्टस् द्विपदवीधर.

मराठी अनुवाद: **यशश्री पुणेकर**, संदर्भ गटात सहभागी

*(कळीचे शब्द: कथा, चक्रीवादळ, समुद्री लाटा, हारुकी मुराकामी)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***